# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 30.06.2025** **वार-सोमवार**

---

**<u>पुणे एसटी विभाग</u>**

राज्य परिवहन महामंडळाच्या लांब आणि मध्यम पल्ल्याच्या गाडीतून १५० किलो मीटरपेक्षा जास्त अंतराच्या प्रवासासाठी आगाऊ आरक्षण करणाऱ्या पूर्ण तिकीट असलेल्या प्रवाशांना तिकीट दरात १५ टक्के सवलत दिली जाणार आहे. ही योजना दिवाळी आणि उन्हाळी सुट्टीचा गर्दीचा हंगाम वगळता वर्षभर सुरू राहणार आहे. या योजनेची सुरुवात उद्या म्हणजे १ जुलैपासून करण्यात येणार आहे. १ जून रोजी एसटीच्या ७७व्या वर्धापन दिनानिमित्त परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक याबाबत घोषणा केली होती; ज्यादा बसेस काढून ही योजना सर्व प्रकारच्या बससाठी लागू करण्यात येत आहे. ही योजना पूर्ण तिकीट काढणाऱ्या प्रवाशांसाठीच लागू असेल.

दरम्यान राज्य परिवहन महामंडळाच्या पुणे विभागाने यावर्षी मे महिन्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत सहा कोटी ३० लाख रुपयांचं अतिरिक्त उत्पन्न मिळवलं आहे. मे महिन्यात एसटीच्या पुणे विभागाचं उत्पन्न राज्यात सर्वाधिक आहे. एसटीच्या प्रवासी वाहतूक नियमानुसार यंदा पुणे विभागाला जवळपास चार कोटी रुपयांचा नफा झाला असल्याचं परिवहन महामंडळानं म्हटलं आहे.

**<u>सुरक्षा</u>**

पुण्यातील बोपदेव घाटात नुकत्याच घडलेल्या सामूहिक अत्याचाराच्या घटनेनंतर पुणे पोलीस आणि वन विभागानं शहरातील २२ प्रमुख टेकड्यांवर अत्याधुनिक सुरक्षा प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भातील पथदर्शी प्रकल्प बोपदेव घाटात सुरू झाला आहे. या प्रकल्पाचा भाग म्हणून बोपदेव घाटात २५ सीसीटीव्ही कॅमेरे, फ्लडलाइट्स, आयपी स्पीकर्स आणि आपत्कालीन कॉल बॉक्स बसवण्यात आले आहेत. या अत्याधुनिक सुरक्षा व्यवस्थेमुळे आपत्कालीन परिस्थितीत त्वरित मदत मिळणे शक्य होणार आहे.

**पोलिसठाणे**

पुण्यातील आंबेगाव पोलीस ठाण्याला ISO 9001:2015 मानांकन मिळालं आहे. पुणे आयुक्तालयातील हे पहिलंच पोलीस ठाणं आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते आंबेगाव पोलीस ठाण्याला हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आलं. आंबेगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या प्रयत्नामुळे आंबेगाव पोलीस ठाण्याला हे मानांकन मिळालं आहे. आंबेगाव पोलीस ठाण्यातील आवश्यक नोंदी असलेली सर्व कागदपत्र अद्ययावत असून कामकाजामध्ये सुसूत्रता आली आहे.

**पुणेमनपा**

पुणे शहरातील रस्ते स्वच्छ करण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या वतीने १ ते ४ जुलै या काळात डीप क्लीन मोहीम राबवली जाणार आहे. या मोहिमेत प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयांतील अंतर्गत एक महत्वाचा रस्ता अशा पद्धतीने विविध भागांतील सुमारे ६० रस्त्यांची स्वच्छता केली जाणार आहे. यामध्ये महापालिकेतील सर्व विभाग सहभागी होणार असून, या मोहिमेच्या यशानंतर इतर रस्त्यांची दुरुस्ती आणि स्वच्छता केली जाणार आहे, अशी माहिती पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी दिली.

**वाणिज्यदूत**

कोरियन भाषा शिकल्याने भारतीय विद्यार्थ्यांना संधींची असंख्य दारं उघडतील. तसंच भारतीय विद्यार्थ्यांना कोरियाच्या कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधीही मिळतील असं प्रतिपादन दक्षिण कोरियाचे मुंबईतील मुख्य वाणिज्यदूत यू डोंग-वान यांनी नुकतंच पुण्यात केलं. इंडो-कोरियन सेंटर संचालित किंग सेजॉग इन्स्टिट्यूटच्या वतीने बालेवाडी इथं कोरियन भाषेतील वक्तृत्व स्पर्धा झाल्या; त्यावेळी ते बोलत होते. कोरियन भाषा आणि संस्कृतीचा जागतिक स्तरावर प्रचार होण्यासाठी अशा स्पर्धा आयोजित केल्या जातात.

**नन्हेफरिश्ते**

मध्य रेल्वेच्या पोलिस दलानं ऑपरेशन नन्हे फरिश्तेअंतर्गत मागील दोन महिन्यांत २३५ मुलांचा शोध घेऊन त्यांना त्यांच्या पालकांकडे सुखरूप सोपवलं आहे. त्यामध्ये पुणे विभागातून ५१ मुलांना शोधण्यात यश आलं.

**काररॅली**

सामाजिक समावेशकतेला चालना देण्यासाठी राउंड टेबल इंडिया संस्थेतर्फे दृष्टीबाधितांसाठी 'बियाँड साइट', या अनोख्या कार रॅलीचं आज पुण्यात करण्यात आलं होतं. हातात स्मार्टफोन, कानावर पडणाऱ्या सूचना, त्यानुसार कारचालकांना चतुरपणाने मार्ग दाखवत, २२ किलोमीटरची ही रॅली पूर्ण करून दृष्टीबाधित बांधवांनी आनंद साजरा केला. 'अपंगत्व म्हणजे असमर्थता नव्हे' हा सामाजिक संदेशही या उपक्रमातून देण्यात आला.

**बुद्धिबळ**

पुण्यात नुकत्याच पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय मानांकित खेळाडूंच्या बुद्धीबळ स्पर्धेत महाराष्ट्राचा अथर्व मडकर विजेता ठरला. त्याने नऊ फेऱ्यामध्ये साडेसात गुणांची कमाई केली. अंतिम फेरीत त्याने गुजरात पेट्रोलियम बोर्डच्या राहुल संगमा याला बरोबरीत रोखलं. त्याला सत्तर हजार रुपये आणि चषक प्रदान करण्यात आला. महाराष्ट्राचा श्रीराज भोसले दुसऱ्या आणि शाश्वत गुप्ता तिसऱ्या स्थानावर राहिला.

**क्रीडा**

एसएनबीपी आंतरशालेय जिल्हास्तरीय क्रीडा अजिंक्यपद स्पर्धा पुण्यात नुकत्याच पार पडल्या. यामध्ये फुटबॉल या क्रीडा प्रकारात फुलगावच्या नेताजी सुभाषचंद्र बोस मिलिटरी स्कूल संघाने विजेतेपद पटकावलं. अंतिम फेरीत त्यांनी चीखलीच्या एसएनबीपी इंटरनॅशनल स्कूल संघाचा पराभव केला. स्पर्धेत जिल्ह्यातील 18 संघांनी सहभाग घेतला होता.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज अधून मधून पावसाच्या हलक्या सरी बरसल्या. उद्याही शहर परिसरात आकाश ढगाळ राहून हलका पाऊस पडेल तर घाट परिसरात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**